दै. सत्यप्रभा दि. 25.01.25

# पावणेचार लाखांचा गुटखा जप्त

## गणपूरमधील कारवाईत दोघांविरुद्ध गुन्हा



अर्धापूर, दि. २४ : मुदखेड तालुक्यातून विक्री केलेला गुटखा अर्धापूर तालुक्यातील एकाच्या घरी सापडला. यात तीन लाख ६७ हजार ९२६ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला असून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

महाराष्ट्र शासनाकडून प्रतिबंधित असलेला व छुप्या मार्गाने विक्री होत असणारा गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा तालुक्यातील गणपूर परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि महेश कोरे, विजय आडे, गोणारकर, महेंद्र डांगे, अखिल बेग या पथकाने २३ रोजी तालुक्यातील गणपूर परिसरात सायंकाळी पाच वाजता एका घराची झडती घेतली. यावेळी स्वयंपाक खोलीच्या पाठीमागे असलेल्या एका (पान दोनवर)

दै. गोदातीर दि. 25.01.25

# ३.७५ लाखांचा गुटखा पकडला, एकास अटक; अर्धापूर पोलिसांची गणपूर येथे कारवाई



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील गणपूर येथील एका घरात साठवलेला पावणेचार लाख रुपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा गुरूवारी सायंकाळी अर्धापूर पोलिसांनी धाड टाकून पकडला. यातील एक आरोपी गजाआड केला असून न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तर यातील अन्य एक आरोपी फरार आहे.

अर्धापूर तालुक्यातील गणपूर येथे शासनाकडून प्रतिबंधित केलेला गुटखा आरोपी नवनाथ दिगंबर गादेवार रा. गणपूर यांच्या घरामध्ये गुटखा असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने दि. २३ जानेवारी रोजी सायंकाळी नवनाथ दिगंबर गादेवार यांच्या घरावर छापा मारला. यावेळी पोलिसांना प्रतिबंधित असलेला तंबाखू जन्य राजनिवास संगधीत पान मसाला, गोवा-१०००, वजीर संगधित पान मसाला, मुसाफिर, विमल, आरएमडी, रजनीगंदा आदी कंपनीचा एकूण ३ लाख ६७ हजार ९२६ रुपये किंम तीचा गुटखा सापडला. या प्रकरणी दोन आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून यापैकी एक आरोपी नवनाथ दिगंबर गादेवार रा. गणपूर यांना पोलिसांनी अटक केली. तर दुसरा आरोपी साईनाथ बने हा फरार झाला आहे.

या प्रकरणी सर्व मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून यातील आरोपी नवनाथ दिगंबर गादेवार याला दि.२४ जानेवारी रोजी अर्धापूर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.